**महाराष्ट्र शासन**
**महसुल विभाग**
**तहसिल कार्यालय आष्टी**

**दुरध्वनी क्रंमाक** -07156-225648 **ईमेल आई डी-** roashti@gmail.com

**क्रमांक/अ.का/त.आस्था /कावि** -538/2023 **दिनांक** - 25 / 04 / 2023

**संदर्भ** :- मा. जिल्हाधिकारी,वर्धा यांचे पत्र क्र. कक्ष-ब/म.सहा./आस्था/कावि-565/2023 दिनांक 18 एप्रिल 2023.

**जाहीरनामा** :-

सर्व नागरीकांना याव्दारे सुचित करण्यात येते कि, आष्टी तालुक्यातील खालील तलाठी साझा करीता, त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातुन कोतवाल पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | कोतवाल पद भरावयाचा साझा क्र. व नांव | कोतवाल पद भरावयाची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| 1 | **तलाठी साझा नांदोरा** | 01 | **अनुसूचित जमाती** |
| 2 | **तलाठी साझा खडकी** | 01 | **भटक्या जमाती - ब** |
| 3 | **तलाठी साझा साहुर** | 01 | **ईतर मागास प्रवर्ग** |
| 4 | **तलाठी साझा तळेगांव** | 01 | **आर्थीक दुर्बल घटक** |
| 5 | **तलाठी साझा भारसवाडा** | 01 | **आर्थीक दुर्बल घटक** |
| 6 | **तलाठी साझा नरसिंगपुर** | 01 | **अराखीव** |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरिता इच्छुक स्थानिक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहे. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटोसहीत अर्ज आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहीत दिनांक 09 **मे** 2023 रोजी **सायंकाळी** 04.00 वाजेपर्यन्त कार्यालयीन वेळेत तहसीलदार, आष्टी यांच्या कार्यालयात सादर करावेत व त्याबाबत पोच घ्यावी. अर्जाचा नमुना तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेत कार्यालयीन वेळेत व दिवशी उपलब्ध आहे. विहीत तारखे नंतर येणाऱ्या व अपुर्ण भरलेल्या अर्जाचा तसेच जाहीरनाम्याच्या पूर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

## कोतवाल भरती संबंधी वेळापत्रक

1) अर्ज स्विकारण्याची तारीख 26 **एप्रिल** 2023 ते शेवटची तारीख 09 **मे** 2023 रोजी **सायंकाळी** 04.00 वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन)
2) अर्जाची छाननी दिनांक 09 **मे** 2023 रोजी **दुपारी** 04.00 वाजेपासून **तहसिल कार्यालय**, **आष्टी** येथे करण्यांत येईल. पात्र / उमेदवारांची यादीची प्रसिध्दी त्याच दिवशी तहसिल कार्यालय, आष्टी यांचे नोटीस बोर्डावर लावण्यांत येईल.

25/04/2023

3) दिनांक 10/05/2023 ते 15/05/2023 पात्र /अपात्र उमेदवारांचे यादीवर आक्षेप दाखल करता येतील दिनांक 16/05/2023 रोजी अंतिम पात्र /अपात्र उमेदवारोंची यादी जाहीर करण्यात येईल.

4) पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा **मंगळवार** दिनांक 23 **मे** 2023 रोजी जिल्हास्तरवर घेण्यांत येईल. सर्व पात्र उमेदवारांनी आपले अर्जाची **पोचपावतीसह** परिक्षेस उपस्थित रहाणे बंधनकारक आहे.

5) सदर परिक्षेला आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य, कॅल्क्युलेटर, मोबाईल इत्यादी घेऊन बसता येणार नाही.

6) लेखी परिक्षा देणाऱ्या सर्व उमेदवारांची मुलाखत दिनांक 25 **मे** 2023 रोजी जिल्हास्तरावर घेण्यांत येईल.

7) उमेदवारांची निवड लेखी परिक्षा व मुलाखत यांच्यात मिळालेले एकुण गुण लक्षात घेवून गुणानुक्रमे करण्यांत येईल.

## कोतवाल भर्तीसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे

1) उमेदवार ज्या साझ्यासाठी अर्ज करीत आहे. त्या साझ्यातील अंतर्भूत असणाऱ्या गावामधील रहिवासी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्थानिक जागेचा रहिवाशी असल्याबाबतचे (घर टॅक्स पावती/रेशनकार्ड/निवडणूक ओळखपत्र/मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड/पॅन कार्ड/आधार कार्ड) यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.तसेच आवश्यक वाटल्यास तलाठी यांचे रहीवासी प्रमाणपत्र मागविण्यात येईल.

2) **टिप:- तलाठी साझा नांदोरा येथील सर्व गावे ही अप्पर वर्धा धरण क्षेत्राचे पानलोट क्षेत्राखाली असल्याने संपुर्ण गावे रिठ आहेत.करीता नांदोरा साझ्यालगत साझा येनाडा व अंतोरा मध्ये अंतर्भुत असलेल्या गावातील रहीवासी नांदोरा या साझ्याकरीता अर्ज सादर करु शकतील**.

3) उमेदवाराचे वय जाहीरनाम्याच्या दिनांकाला कमीत कमी 18 वर्ष व जास्तीत जास्त 40 वर्ष या दरम्यान असावे. (पुराव्या दाखल जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / पॅन कार्ड /ड्रायव्हींग लायसन्स, यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.) या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

4) उमेदवारांची शैक्षणिक पात्रता इयता 4 थी पास असणे आवश्यक आहे.

5) उमेदवार शारिरिक दृष्टया सक्षम असावा,नियुक्ती नंतर जिल्हा मेडिकल बोर्डाचे /चिकीत्सक प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

6) उमेदवाराने चारित्र्याबाबत सबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात प्रमाणत्र सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

7) सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **जातीचे प्रमाणपत्र न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच उमेदवाराला नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्व सुचना न देता कोणतेही कारण न देता**

21/04/23

**कोणत्याही वेळी नियुक्ती रदद (समाप्त) करण्यात येईल.आर्थीक दृष्टया दुर्बल घटकाकरीता EWS प्रमाणपत्र अनिर्वाय राहील.**

8) अर्जासोबत कुठल्याही **राजकीय पक्षाची शिफारस** जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच निवड प्रक्रिये दरम्यान कुठलाही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यांत येईल.

9) अर्ज हा अर्जदारानेच वैयक्तिक स्वतः हजर राहून सादर करावा. अर्ज पोस्टाव्दारे पाठविण्यात येवु नये.

10) अपुर्ण माहीतीचे अर्ज रद्य करण्यात येईल. त्याबाबत कोणतेही पत्र व्यवहावर करण्यात येणार नाही.

11) अर्जामधील महिती खोटी आढळल्यास अर्ज रद्य करण्यात येईल. किंव नियुक्ती झाल्यानंतर ती रद्य करण्यात येईल.

12) कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील.

13) कोतवाल पदासाठी होणारी परीक्षी ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची राहील.

14) विहीत नमुन्यातील अर्ज तहसील कार्यालय,सेलु येथे **रुपये 20/-शुल्क** भरुन उपलब्ध होईल. (विहीत नमुन्यातील अर्जच स्विकारण्यात येतील)

15) ज्या अर्जदाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवारांची 75 गुणांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल व लेखी परीक्षामध्ये ज्या अर्जदारास किमान 35% टक्के मिळतील त्यांची 25 गुणांची तोंडी परीक्षा घेण्यांत येईल.

16) प्रकिया शुल्क :- उमेदवारांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

| **प्रवर्ग** | **खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | **मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी** |
|---|---|---|
| **परिक्षा शुल्क** | **रु** 500/- (**रु. पाचशे मात्र** /-) | रु. 300/- (**रु.तिनशे मात्र**/-) |

17) मुलाखतीच्या वेळेस मुळ प्रमाणपत्रे आणणे आवश्यक आहे.

18) अर्जदाराला निवड प्रक्रियेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

वरिल सर्व अटी व शर्तींना अनुसरुन तहसीलदार,आष्टी नियुक्ती अधिकारी व जिल्हाधिकारी, वर्धा यांचा निर्णय अंतिम राहिल.

**दिनांक** - 25 **एप्रिल** 2023

25/04/2023

(सचिन कुमावत)
**अध्यक्ष कोतवाल निवड समिती,**
**तथा तहसीलदार, आष्टी**

प्रतिलीपी :- **माहिती करीता सविनय सादर.**

1) मा. जिल्हाधिकारी, वर्धा.
2) मा. उप विभागीय अधिकारी, वर्धा.
3.) मा.जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, NIC वर्धा यांना सदर जाहीरनामा जिल्हयाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसतव सादर.

**माहिती तथा नमुद दिलेल्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत.**

1) जिल्हा माहीती अधिकारी, वर्धा यांना सदर जाहीरनाम्यास व्यापक प्रसिद्धी देण्याकरीता अग्रेषीत.

2) गट विकास अधिकारी पंचायत समिती, आष्टी यांनी नोटीस बोर्डावार लावुन प्रसिध्द करावी व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

3) तलाठी साझा 1) **नांदोरा**, 2) **खडकी**, 3) **साहुर**, 4) **तळेगांव**, 5) **भारसवाडा** 6) **नरसिंगपुर**,7) **येनाडा**, 8) **अंतोरा** ,यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून व साझ्यातील सर्व गावांत तशी प्रसिध्दी / मुनादी देवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

3) सचिव ग्रामंपचायत 11) **नांदोरा**, 2) **खडकी**, 3) **साहुर**, 4) **तळेगांव**, 5) **भारसवाडा** 6) **नरसिंगपुर**,7) **येनाडा**, 8) **अंतोरा**,
यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

4) नायब नाझर, तहसिल कार्यालय, आष्टी यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

Kumawat 21/04/2023

(सचिन कुमावत)
**अध्यक्ष कोतवाल निवड समिती,**
**तथा तहसीलदार, आष्टी**